## नियमित दिवाणी दावा क्र. ७६/२०२४ मधील निशाणी ४७ खालील आदेश
## (CNR No. MHRT08-000520-2024)

मुळ प्रतिवादी क्र. ०१ ते १८/प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ व ११ यांनी प्रतिदावा मिळकत रस्त्यावर उभे केलेले जंगली लाकडी खांब काढून टाकून रस्ता पुर्ववत मोकळा करण्याचा व प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०१ ते ११ यांनी दावा मिळकत रस्त्यावर मुळ प्रतिवादींना स्वतः अगर इतरांमार्फत हरकत व अडथळा होईल, असे कोणतेही कृत्य करु नये, असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी विनंती केली आहे.

०२. मुळ प्रतिवादी क्र. ०१ ते १८/प्रतिदाव्यातील वादी यांचे असे कथन आहे की, मुळ दाव्यात नमुद केलेला रस्ता पुढीलप्रमाणे आहे – मौजे पेढांबे, ता. संगमेश्वर येथिल दावा विषयक मिळकत भूमापन क्र. ५८/४४/अ, क्षेत्र ००.१३.०० आर यामधून मुळ प्रतिवादी क्र. ०१ व ०२ हे करु पहात असलेला बेकायदेशिर रस्ता हा दाव्याचा विषय आहे. तोच रस्ता ही प्रतिदाव्याची दावा मिळकत (वाद मिळकत) आहे. सदरचा रस्ता हा ग्रामपंचायत पेढांबे दप्तरी नोंदविलेला आहे. सदरचा रस्ता हा सन १९८०–१९८१ चे सुमारास ग्रामपंचायत पेढांबेमार्फत बांधण्यात आला. तेव्हा तो कावडी बंदर ते देऊळ असा बांधण्यात आला. त्याची नोंद सन १९८०–१९८१ च्या ग्रामपंचायत पेढांबेच्या नमुना २६ ला अनुक्रमांक ०२ येथे करण्यात आली. त्यानंतर सदर रस्त्याचे दोन भागात विभाजन करण्यात आले व मुख्य रस्ता ते चंडिका मानाई मंदिर सडयावर व मुख्य रस्ता ते यशवीचा पऱ्या रस्ता असे दोन भाग करण्यात आले आहेत. दोन भाग करताना मुळ १९८०–१९८१ सालचा रस्ता जो कावडीबंदर येथुन सुरु होत होता तो यशवीचा पऱ्यापर्यंत नेणेत आला व त्याची सुरुवात यशवीचा

पऱ्यापासुन करण्यात आली. या दोन्ही रस्त्याची नोंद ग्रामपंचायत पेढांबेच्या सन २०१२–२०१३ च्या नमुना २६ ला अनुक्रमांक १० व ११ येथे करण्यात आली. यातील अनुक्रमांक ११ चा गाव मौजे पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील मुख्य रस्ता ते यशवीचा पऱ्या हा रस्ता दावा मिळकत (वाद मिळकत) आहे.

**०३**. सदर मुळ प्रतिवादींचे म्हणणे पुढे असे आहे की, सदर रस्त्याशी भिकी महादेव मते व त्यांचे सहहिस्सेदार यांचा कोणताही हक्कसंबंध नाही. असे असतानाही, सन २०१७ साली भिकी महादेव मते, सविता अनंत मते, शेवंती धोंडु वेलोंडे, सुरेश सोनु मते, भिकाजी सखाराम मते, वासंती महादेव जावळे यांनी वर उल्लेखीत वाद मिळकत रस्त्यामध्ये लोखंडी खांब उभारुन वाहतुकीला अडथळा निर्माण होईल, असे कृत्य केले व या कृत्याला त्यांचे नातेवाईक प्रकाश सोनु मते, शांताराम सखाराम मते, चंद्रकांत सखाराम मते यांनी पाठींबा दिला. त्याबाबत, प्रतिवादींच्या कैफियतीत नमुद केल्याप्रमाणे, ग्रामपंचायत पेढांबेमार्फत सदरचा अडथळा दुर करण्यात आला. परंतु, त्यानंतर त्याच दिवशी म्हणजेच दिनांक १७/१०/२०२४ रोजी दिनेश भिकाजी मते व सुरेश सोनु मते यांनी सदर रस्त्यावर जंगली लाकडी खांब उभे करुन वाहने जाण्या–येण्याचा रस्ता बंद केला. सदरचे खांब त्यांनी मुख्य रस्त्यापासुन पुर्व दिशेला ४५ मीटर अंतरावर उभे केले आहे. सदरचे खांब रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या डांबरी कडेपासुन प्रत्येकी अडीच फूट अंतरावर उभे केले आहेत.

**०४**. सदर मुळ प्रतिवादींचे म्हणणे पुढे असे आहे की, त्यामुळे प्रतिवादी व सदर रस्त्याचा वापर करण्याच्या वाडीतील सुमारे ४० ते ५० कुटूंबांच्या न्याय हक्कावर परिणाम झाला आहे. रस्त्यात अडथळा निर्माण केल्यामुळे वाडीतील कुटुंबाच्या घरापर्यंत वाहने जाऊ शकत नाहीत. त्यामुळे, त्यांना नित्य कामासाठी, आजारपणासाठी वाहन वापरावयाचे झाल्यास अडथळा निर्माण झाला आहे व मोठी

गैरसोय निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्याचा व जीवीताचा प्रश्न निर्माण झाला आहे. वर उल्लेख केलेला अडथळा करणाऱ्या व्यक्तिंचा सदर रस्त्याशी कोणताही हक्कसंबंध नाही. कारण, सदरचा रस्ता वर उल्लेख केल्याप्रमाणे ग्रामपंचायत पेढांबेमार्फत सुमारे ४४ वर्षांपुर्वी बांधलेला आहे व त्याची ग्रामपंचायत दप्तरी नोंद आहे.

**०५**. सदर मुळ प्रतिवादींचे म्हणणे पुढे असे आहे की, प्रतिदावा गुणदोषांवर चालण्यास बराच कालावधी जाणार असून दरम्यानच्या काळात सदर रस्ता बंद राहील्यास सदर मुळ प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होईल. प्रथमदर्शनी केस व न्यायाचे संतुलन मुळ प्रतिवादींच्या बाजूने आहे. सबब, अर्ज मंजूर करण्यासाठी पिनंती करण्यात आली आहे. अर्जाच्या पृष्ठयर्थ निशाणी क्रमांक ४८ अन्वये प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे.

**०६**. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०१ व १० या दोघीही मयत असल्याने त्यांचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत निशाणी क्रमांक ५४ कडील कागदपत्रांच्या यादीसोबत प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०८ यांनी दाखल केली आहे. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०६ विरुध्द प्रतिदावा एकतर्फा चालविण्याचा आदेश दिनांक १४/१०/२०२५ रोजी पारीत करण्यात आला आहे.

**०७**. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७, ०९ व ११ यांचेतर्फे मुखत्यार प्रतिवादी क्र. ०८ – चंद्रकांत सखाराम मते यांनी स्वतःकरीता व प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७, ०९ व ११ करीता तुर्तातुर्त ताकिद अर्जास म्हणणे निशाणी क्रमांक ५५ कडे दाखल करुन अर्जास हरकत घेण्यात आली आहे. त्यामध्ये त्यांचे असे म्हणणे आहे की, मौजे पेढांबे या गावात प्रतिदाव्यातील प्रतिवादींच्या वडीलोपार्जीत जमीन मिळकती सामाईकात असुन त्यांचे अद्याप पर्यंत कायदेशीर वाटप झालेले नाही. त्यांचे पैकी काही सहिस्सेदारांची नावे सातबारा सदरी

नमुद नाहीत. सदरची नावे नमुद करण्यासाठी तसेच मिळकतींचे कायदेशीर वाटप मिळविण्यासाठी याच न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक ४५/२०२२ असा प्रलंबित दावा वादीचे सहहिस्सेदारांनी दाखल केलेला असुन त्याकरीता वादीने संमती दिलेली होती व आहे. नियमित दिवाणी दावा क्रमांक ४५/२०२२ या दाव्याचे कामी गट क्रमांक व उपविभाग ५८/४४/अ ही मिळकत देखील समाविष्ट केलेली असुन ती बाब ग्रामपंचायत पेढांबे यांना माहित आहे. मौजे पेढांबे येथील गट क्रमांक व उपविभाग ५८/४४/अ या दावा मिळकतींमध्ये वादी व त्यांचे सहिस्सेदारांची वाड वडीलांपासुन मालकी वहिवाट आहे. सदर मिळकतीतुन मुळ प्रतिवादी म्हणजेच प्रतिवादी क्र. ०३ ते १८ हे प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ सरपंच व ग्रामसेवक यांना हाताशी धरुन अनाधिकाराने बेकायदेशीरपणे वादीची व प्रतिदाव्यातील प्रतिवादींची कोणतीही परवानगी न घेता रस्ता तयार करु पाहत आहेत. सदर रस्ता वादीच्या खाजगी मालमत्तेतुन करण्याचा अधिकार प्रतिवादींना नाही. तसेच वादीची या करीता परवानगी अगर संमती देखील नाही.

**०८.** प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांचेतर्फे पुढे असे म्हणणे आहे की, वादीची मिळकत क्रमांक ५८/४४ अ मधुन केवळ गणेश विसर्जन करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात पायवाट देण्याचे अलीकडील काही वर्षांपुर्वी ठरले होते. सद्या सदर पायवाटेचे स्वरुप बदलले व त्या ठिकाणाहुन वाहने येण्या–जाण्यास सुरुवात झाली. मात्र, वादीने ग्रामस्थांच्या अडीअडचणी समजुन घेवुन त्याला विरोध केला नाही. माणुसकीखातर एखादया व्यक्तीस वैद्यकीय उपचारासाठी जाण्या–येण्यासाठी रिक्षा अथवा दुचाकीचा वापर केल्यास वादी हरकत घेत नव्हती व नाही. अशी सर्व परीस्थीती असताना, केवळ लोकांची सोय व्हावी म्हणुन वादी व इतर सर्व सहहिस्सेदारांनी मिळुन पायवाट व दुचाकी साठी रस्ता चालु ठेवला. मात्र वादीच्या चांगुलपणाचा गैरफायदा ग्रामस्थ हे ग्रामपंचायतीला हाताशी धरुन घेत आहेत व

रस्त्याबाबत वादीवर दबाव आणत आहेत. वास्तविक पाहता, सदर रस्त्याशी ग्रामपंचायत पेढांबे यांचा कोणताही कसलाही कायदेशीर हक्क संबंध नाही.

**०९.** प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांचेतर्फे पुढे असे म्हणणे आहे की, अलीकडील काळामध्ये सदर रस्त्यावरुन अवजड वाहनांची वाहतुक देखील मोठया प्रमाणावर होवु लागली आहे. प्रत्येक जण व्यवसायीक कारणासाठी तसेच व्यक्तीगत फायद्यासाठी सदर रस्त्याचा वापर करु लागला आहे. सदर रस्ता वळणांचा व उतारांचा आहे. सदर रस्त्यावरुन अवजड वाहनांची होणारी ये–जा ही रस्त्याची झीज करणारी व धोकादायक बनलेली आहे. त्यामुळे, सदर रस्त्यावरुन अवजड वाहनांची वाहतुक शक्यतो न करता पुर्वीप्रमाणे गणपती विसर्जनासाठी तसेच वैद्यकीय कारणांसाठी कोणाला न्यावे–आणावे लागल्यास वरील रस्त्याचा वापर करण्यास वादीची कसलीही हरकत नव्हती व नाही. मात्र सदर रस्त्यावर ग्रामपंचायत पेढांबे हे अनाधिकाराने डांबरीकरण करण्याचे काम सुरु करण्याचे तयारीत असल्यामुळे प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आला आहे.

**१०.** प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांचेतर्फे पुढे असे म्हणणे आहे की, ग्रामपंचायत पेढांबे यास अनेक वेळा सदर रस्त्याबाबत ग्रामपंचायतीचे दप्तरी नोंद आहे किंवा कसे याबाबत माहिती मिळविण्यासाठी माहितीचे अधिकारात अर्ज केला असता दावा विषयक मिळकतीतुन पुर्वीच्या असलेल्या ''रस्त्यावर कोणताही सरकारी निधी खर्च झालेला नाही. रस्त्यासाठी कोणतीही संमती घेतलेली नाही'' असे लेखी उत्तर दिलेले आहे. यावरुन, हे स्पष्ट होते की, ग्रामपंचायत पेढांबे यांचा या रस्त्यावर कोणताही कायदेशीर हक्क अधिकार नाही. तरीही, वेळोवेळी सदर विषयावरुन वादीला ग्रामपंचायतीकडुन नाहक त्रास होत आहे. तसेच ग्रामपंचायती कडुन वेळोवेळी रस्त्यावर हक्क सांगण्यात येत असल्यामुळे सदरचा

हक्क ग्रामपंचायत पेढांबे कोणत्या अधिकारात सांगत आहे. याचे उत्तर ग्रामपंचायत पेढांबे यांच्याकडे नाही. ते मिळविण्यासाठी ही वादींनी आजवर अनेक अर्ज ग्रामपंचायत पेढांबे यांचेकडे दिलेले आहेत. मात्र कोणत्याही अर्जाचे उत्तर आजतागायत वादीला २०१७ चे उत्तरानंतर प्राप्त झालेले नाही.

**११**. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांचेतर्फे पुढे असे म्हणणे आहे की, अशी सर्व परीस्थीती असताना सदर दाव्याचे कामी खोटी व खोडसाळ कागदपत्रे सादर करुन प्रतिवादींनी खोडसाळ स्वरुपाचा प्रतिदावा दाखल केला आहे व सदरचा खोडसाळ तुर्तातुर्त अर्ज दाखल केलेला आहे. सबब, तो खर्चासह रद्द होणेस पात्र आहे. वादीने केव्हाही दावा मिळकतीतील रस्ता अडविण्याचा प्रयत्न केलेला नव्हता व नाही. प्रतिवादींच्या तुर्तातुर्त ताकिद अर्जातील परीच्छेद क्रमांक ०२ मध्ये उल्लेखीत प्रमाणे सन २०१७ साली वादी व इतर सहहिस्सेदारांनी रस्ता बंद केला होता, असे जर कथन असेल तर त्याबाबत ग्रामपंचायत व इतर ग्रामस्थ यांनी काहीही कारवाई वादींवर का केली नाही, याचे स्पष्टीकरण प्रतिवादी देत नाहीत.

**१२**. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांचेतर्फे पुढे असे म्हणणे आहे की, उलटपक्षी प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीतुन अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे वादीची व त्यांच्या सहहिस्सेदारांची कोणतीही लेखी अगर तोंडी परवानगी न घेता पक्का डांबरी रस्ता तयार करीत आहेत. सदर प्रकरणी मुळ प्रतिवादींनी दाखल केलेले सर्व कागदपत्रे खोटे व खोडसाळ स्वरुपाचे आहेत. सदर कागदपत्रांवरुन रस्त्याबाबत कोणतीही बाब स्पष्ट होत नाही. याही कारणास्तव प्रतिवादीचा सदरचा तुर्तातुर्त ताकिद अर्ज फेटाळण्यात यावा. ग्रामपंचायत पेढांबे यांचेकडुन वारंवार प्रतिदाव्यातील प्रतिवादींवर रस्त्याच्या कारणांवरुन दबाव टाकला

जात होता व आहे. मुळ प्रतिवादी क्र. ०३ ते १८ हे ग्रामपंचायतीला हाताशी धरुन प्रतिदाव्यातील प्रतिवादींच्या कायदेशीर हक्कांवर गदा आणत आहेत. वास्तविक पाहता, वादीच्या दावा मिळकतीतील रस्त्याबाबत सदरचा वाद असल्याने प्रतिवादीला अशा प्रकारचा अर्ज करण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. सदर ठिकाणी केवळ गणपती विसर्जन करण्यासाठी कावडी बंदर याठिकाणी जाण्यायेण्यासाठी पायवाट मते कुटूंबियांकडुन लोकांची सोय होण्यासाठी देण्यात आलेली होती. मुळ रस्ता हा त्या ठिकाणापासुन नसुन दुसरा मार्ग आहे. मात्र तो मार्ग पावसाळ्यात निसरडा होत असल्याने केवळ गणपती विजर्सनाकरीता माते कुटुंबियांनी लोकांनी पर्यायाी मार्ग केवळ गणपती विसर्जनाकरीता उपलब्ध करुन दिला होता या गोष्टीचा गैरफायदा घेवुन ग्रामपंचायतीने खोटे व खोडसाळ नोंदी दाखवुन खोटा व खोडसाळ प्रतिदावा दाखल केलेला आहे व सदरील तुर्तातुर्त ताकीद अर्ज विनाकारण मते कुटूंबियांना मानसिक त्रास देण्याचे हेतुने केलेला असुन तो अर्ज खरा व सद्भावाचा नाही. सदर तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजुर होण्यास पात्र असुन तो नामंजुर करण्यासाठी विनंती करण्यात आली आहे. आपल्या म्हणण्याच्या पृष्ठयर्थ निशाणी क्रमांक ५६ अन्वये प्रतिवादी क्र. ०८ शपथपत्र सादर केले आहे.

**१३**. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०२ ने निशाणी क्र. ६५ अन्वये प्रतिदाव्याची कैफियत प्रस्तुत अर्जावरील म्हणणे संयुक्तिकरित्या सादर केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिदाव्यात व प्रतिवादींच्या तुर्तातुर्त ताकीद अर्जात नमुद केलेला मुख्य रस्ता ते यशवीचा पऱ्या हा रस्ता गेले अनेक वर्षे अस्तीत्वात आहे. सदर रस्त्याची ग्रामपंचायत दप्तरी तशी नोंद करण्यात आली आहे. सदर रस्त्यावरुन कावडी बंदर या ठिकाणी गेली अनेक वर्षे गणपती विसर्जन व अन्य सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतुक केली जाते. सदर रस्त्याशी मुळ वादी भिकी मते अथवा तिचे अन्य सहहिस्सेदार यांचा कोणताही हक्क संबंध नाही. सदर रस्त्याबाबत त्यांनी कुठलाही

अडथळा कोणालाही कधीही निर्माण केलेला नाही. त्याबाबत प्रतिदाव्यात त्यांचे विरुध्द नमुद केलेला मजकुर त्यांना मान्य नाही. सदर रस्त्यात दिनांक १७/१०/२०२४ रोजी दिनेश भिकाजी मते, सुरेश सोनु मते यांनी जंगली लाकडी खांब उभे करुन वाहने जाण्या येण्याचा रस्ता बंद केला असुन त्याबाबत त्यांनी माहिती आहे. त्याबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. ते जन्मापासुनच पेढांबे गावाची रहिवासी आहे. सदर वर उल्लेखीत रस्त्याचा वापर वाडीतील सुमारे ४० ते ५० कुटूंबे करतात. रस्त्यात अडथळा निर्माण केल्यामुळे वाडीतील या कुटूंबाच्या घरापर्यंत वाहने जाऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांना नित्य कामासाठी व आजारपणासाठी वाहन वापरायचे झाल्यास अडथळा निर्माण झाला आहे व मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. त्यामुळे, त्यांच्या आरोग्याच्या व जीवीताचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी वर उल्लेख केलेला रस्त्यातील अडथळा दुर होणे गावाच्या लोकांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे म्हणणे सादर करण्यात आले आहे. आपल्या म्हणण्याच्या पृष्ठयर्थ निशाणी क्रमांक ६६ कडे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

**१४.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

**१५.** प्रस्तुत अर्ज निकाली काढण्याच्या अनुषंगाने मी खालील मुद्दे विचाराधीन घेतले. त्यांचे सबळ कारणांसहीत निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिदाव्यातील वादींनी सकृतदर्शनी केस त्यांच्या बाजुने असल्याचे शाबीत केले आहे का? | ...होय. |
| २. | प्रतिदाव्यातील वादींनी न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे, असे शाबीत केले आहे का? | ...अंशतः होय. |

| | | |
|---|---|---|
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास प्रतिदाव्यातील वादींचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होईल, असे शाबीत केले आहे का ? | ...अंशतः होय. |
| ४. | काय आदेश ? | ...अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ करीता** :–

**१६.** सदरील मुददे एकमेकांशी संलग्न असल्याने, पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. तुर्तातुर्त मनाईचा अर्ज निकाली काढताना अर्ज करणाऱ्याच्या बाजुने सकृतदर्शनी केस आहे का, न्यायाचा तौलानिक तराजु कोणाच्या बाजुने आहे व अर्ज मंजुर केल्यास कोणत्या पक्षकाराचे जास्त नुकसान होईल, हे पाहणे गरजेचे असते. त्यासाठी प्रस्तुत प्रकरणात उभयपक्षकारांतर्फे मांडलेले अभिकथन व दाखल केलेली कागदपत्रे पाहणे आवश्यक आहे.

**१७.** मुळ वादीने निशाणी ०५ सोबत व प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांनी निशाणी क्रमांक ५४ व ७० कडील कागदयादी सोबत खालील कागदपत्रे दाखल केली आहेत –

| *अनु. क्र.* | *कागदांचा तपशील* | *दिनांक* |
|---|---|---|
| १ | गाव मौजे पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील गट क्रमांक व उपविभाग ५८/४४/अ या मिळकतीचा सातबारा उतारा. | १८/१०/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| २ | वादी यांनी मा. सरपंच, ग्रामपंचायत पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना रजिस्टर पोस्टामार्फत पाठविलेला अर्ज. | ०८/०९/२०२३ |
| ३ | वादी यांनी मा. सरपंच, ग्रामपंचायत पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना रजिस्टर पोस्टाची पावती. | ०८/०९/२०२३ |
| ४ | वादी यांनी मा. सरपंच, ग्रामपंचायत पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना रजिस्टर पोस्टाची पोहोच पावती. | अस्सल |
| ५ | वादी यांनी मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमेश्वर, (देवरुख) जि. रत्नागिरी यांना रजिस्टर पोस्टामार्फत पाठविण्यात आलेला अर्ज. | ०८/०९/२०२३ |
| ६ | वादी यांनी मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमेश्वर, (देवरुख) जि. रत्नागिरी यांना रजिस्टर पोस्टामार्फत पाठविलेल्या अर्जाची पावती. | ०८/०९/२०२३ |
| ७ | वादी यांनी मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमेश्वर, (देवरुख) जि. रत्नागिरी यांना रजिस्टर पोस्टामार्फत पाठविण्यात आलेला अर्जाची पोहोच पावती. | अस्सल |
| ८ | वादी यांनी पोलीस निरीक्षक साहेब, पोलीस ठाणे संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना दिलेला अर्ज. | २८/०२/२०२४ |
| ९ | ग्रामपंचायत पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांनी वादीचे माहिती अधिकारात दिलेल्या अर्जाची माहिती | ३१/१०/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| | माहिती जावक क्र. ४१/२०१७. | |
| १० | वादी यांनी मा. ग्रामसेवक/सरपंच, ग्रामपंचायत पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना रजिस्टर पोस्टामार्फत वकीलांमार्फत पाठविलेली नोटीस. | ०८/१०/२०२४ |
| ११ | वादी यांनी मा. ग्रामसेवक/सरपंच, ग्रामपंचायत पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना रजिस्टर पोस्टामार्फत वकीलांमार्फत पाठविलेली नोटीस रजिस्टर केल्याची पोस्टाची पावती. | ०८/१०/२०२४ |
| १२ | वादी यांनी मा. ग्रामसेवक/सरपंच, ग्रामपंचायत पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना रजिस्टर पोस्टामार्फत वकीलांमार्फत पाठविलेली पोस्टीच पोहोच पावती. | अस्सल |
| १३ | वादी भिकी महादेव मते हिने चंद्रकांत सखाराम मते यांना दिलेले मुखत्यारपत्र | ०८/०४/२०१९ |
| १४ | वादीचे आधारकार्ड | छायांकित प्रत |
| १५. | प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७, ०९ व ११ यांनी प्रतिवादी क्र. ०८ यांच्या लाभात करुन दिलेले मुखत्यारपत्र | मुळप्रत |
| १६ | दावा मिळकत रस्त्यासंदर्भातील दिनांक ०३/११/२०२५ रोजीची दोन छायाचित्रे | मोबाईल प्रींट |

वादीने दाखल केला आहे.

**१८.** तसेच मुळ प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादींतर्फे निशाणी क्रमांक ३२,

७३ व ७५ कडील कागदयादी सोबत खालील कागदपत्रे दाखल केली आहेत –

| *अनु. क्र.* | *कागदांचा तपशील* | *दिनांक* |
| --- | --- | --- |
| १ | दाव्यातील वाद मिळकत रस्त्याचे सद्यस्थिती दर्शविणारे दोन छायाचित्रांचे नग | – |
| २ | गटविकास अधिकारी, (गट – अ) पंचायत समिती, संगमेश्वर, यांचा आदेश. | १४/०९/२०२३ |
| ३ | गाव पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील सन १९८०–१९८१ चा गाव नमुना २६ चा उतारा | २०/०२/२०२५ |
| ४ | गाव पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील सन २०१२–२०१३ चा गाव नमुना २६ चा उतारा | २०/०२/२०२५ |
| ५ | प्रतिवादी क्र. १० यांनी प्रतिवादी क्र. ०३ ते ०९ व ११ ते १८ यांनी करुन दिलेले मुखत्यारपत्र | १६/१२/२०२४ |
| ६ | वादी मिळकतीचा हातनकाशा | २०/०२/२०२५ |
| ७ | प्रतिदावा मिळकत रस्त्याची दिनांक ०५/११/२०२५ रोजीचे सद्यस्थिती दर्शविणारे फोटो – ६ | ०५/११/२०२५ |
| ८ | आजारी व्यक्तिंना प्रतिदावा मिळकत रस्त्यावरील अडथळामुळे न्याचे लागणाऱ्या परिस्थीतीचे फोटो – २ | जुन – २०२२ |
| ९ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांनी दिलेल्या खबरी जबाबाची प्रत | १७/१०/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| १० | ग्रामसेवक, ग्रामपंचायत पेढांबे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांचेकडील पंचयादी | १७/१०/२०२४ |
| ११ | संदीप यशवंत येलोंढे यांनी माखजन पोलीस दुरक्षेत्र येथे दिलेल्या तक्रारी अर्जाची छायांकित प्रत | १७/१२/२०२५ |

प्रतिवादीने दाखल केले आहेत.

**१९.** प्रतिदाव्यातील वादींच्या अभिकथनाप्रमाणे, वादमिळकतीचा रस्ता हा सन १९८०-१९८१ च्या सुमारास कावडी बंदर ते देऊळ असा बांधण्यात येवुन त्याची नोंद ग्रामपंचायतीच्या नमुना २६ ला अनुक्रमांक ०२ येथे करण्यात आली होती. त्यानंतर, सदर रस्त्याचे दोन भागात विभाजन करण्यात येवुन त्या दोन्ही रस्त्याची नोंद देखील ग्रामपंचायतीच्या नमुना क्रमांक २६ ला अनुक्रमांक १० व ११ येथे करण्यात आली आहे. याउलट, प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांचे असे म्हणणे आहे की, मुळ वादीच्या मिळकत क्रमांक ५८/४४/अ मधुन तात्पुरत्या स्वरुपात पायवाट देण्यासाठी काही वर्षांपुर्वी ठरले असताना त्यानंतर पायवाटेचे स्वरुप बदलुन वाहने येण्या-जाण्यास सुरुवात झाली. त्यानंतर ग्रामपंचायतीतर्फे अनाधिकाराने सदर रस्त्यासचे डांबरीकरण सुरु झाल्याने मुळ दावा दाखल करण्यात आला असुन तो रस्ता तयार करण्यास वादी व त्यांच्या सहहिस्सेदारांची परवानगी घेण्यात आली नाही.

**२०.** मुळ वादीतर्फे गट क्र. ५८/४४/अ चा सातबारा उतारा दाखल करण्यात आला आहे. त्यावरुन, सदर क्षेत्राच्या भोगवटदार सदरी मुळ वादी व प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०२, ०५ व शेवंती धोंडु येलोंडे यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसुन येते. दिनांक ०८/०९/२०२३ रोजी मुळ वादी व भिकाजी

सखाराम मते यांनी सरपंच, ग्रामपंचायत पेढांबे व गट विकास अधिकारी, संगमेश्वर यांना त्यांची मिळकत क्र. ५८/४४/अ मधुन दिलेल्या पायवाट रत्यावरुन अवजड वाहनांची वाहतुक करण्यास, सदर रस्त्यावर हक्क प्रस्थापित करण्यास त्यांची हरकत असुन त्या रस्त्यावरुन लोकांनी ये–जा करण्यासाठी दुचाकी व रिक्षा वापरण्यासाठी त्यांची हरकत नसल्याचे म्हणणे दिल्याचे दिसुन येते. तसेच, मुळ वादी यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे संगमेश्वर यांच्याकडे सदर रस्त्याच्या वापराबाबत लेखी तक्रार दिल्याचे व त्यावर सदर पोलीस ठाण्यामार्फत 'न्यायालयात दाद मागण्याची समज देवुन तो तक्रारी अर्ज निकाली काढण्यात आल्याचा', शेरा नमुद असल्याचे दिसुन येते.

**२१**. मुळ वादीतर्फे दाखल निर्मल ग्रामपंचायत, पेढांबे यांनी वादीचे मुखत्यार चंद्रकांत सखाराम मते यांना 'धारणाकवाडी मधुन गेलेला रस्ता', अशी ग्रामपंचायत दप्तरी नोंद आढळुन येत नसल्याचे दिनांक २१/१०/२०१७ रोजीच्या पत्रानुसार कळविल्याचे दिसुन येते. दिनांक ०८/१०/२०२४ रोजी मुळ वादीने त्यांचे विधीज्ञांमार्फत ग्रामपंचायत, पेढांबे यांना नोटीस पाठविल्याचे दिसुन येते.

**२२**. प्रतिदाव्यातील वादी यांनी निशाणी क्र. ३२ कडील कागदपत्रांच्या यादीसोबत दाखल केलेली कागदपत्रे पाहिली असता, वाद मिळकतीचे दोन छायाचित्रे त्यांनी दाखल केली असुन सदर रस्त्यावर जंगली लाकडे खांब उभारल्याचे दिसुन येते. गट विकास अधिकारी, संगमेश्वर यांनी ग्रामपंचायत, पेढांबे यांना दिनांक १४/०९/२०२३ रोजीच्या पत्रानुसार पेढांबे मुख्य रस्ता ते यशवीचा पऱ्या हा रस्ता अडविल्याचे प्रत्यक्ष स्थळपाहणीत दिसुन आले असुन सदर रस्त्यावरील अतिक्रमण तात्पुरत्या स्वरुपात हटविण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी आदेशीत केल्याचे दिसुन येते. मौजे पेढांबे येथील गाव नमुना २६ चा सन १९८०– १९८१ व २०१२–

२०१३ मधील उतारा अभिलेखावर दाखल केला असुन सन १९८० – १९८१ च्या उतारामध्ये अनुक्रमांक ०२ कडे 'कावडी बंदर ते देऊळ पर्यंत रस्ता' असल्याचे दिसुन येते. तसेच, साल सन २०१२ ते २०१३ च्या उताऱ्यामध्ये अनुक्रमांक १० व ११ ला 'मुख्य रस्ता ते चंदीडा मानाई मंदीर रस्ता' व 'मुख्य रस्ता ते यशवीचा पऱ्या रस्ता' अशी नोंद असल्याची दिसुन येते. १९८० – १९८१ मधील अनुक्रमांक ०२ कडील नोंदीमध्ये सुधारणा करण्यात आल्याचे व त्या अनुक्रमांक १० व ११ ला नोंद असल्याचे पुढे त्यामध्ये नमुद करण्यात आले आहे.

**२३**. निशाणी क्रमांक ७० सोबत प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांनी वाद मिळकतीसंदर्भातील रस्त्याचे दोन छायाचित्रे दाखल केली असुन त्यामध्ये कोणताही जंगली लाकडी खांब उभारल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर, मुळ प्रतिवादींतर्फे निशाणी क्र. ७३ सोबत वाद मिळकतीच्या रस्त्याची छायाचित्रे दाखल केली असुन त्यामध्ये देखील जंगली लाकडी खांब उभारल्याचे दिसुन येत नाही. निशाणी क्र. ७३ सोबत संगमेश्वर पोलीस ठाणे येथील ८०/२०२४ च्या प्रथम खबरी अहवालाची प्रमाणीत प्रत दाखल केली असुन ती पाहिली असता, शैलेश सुरेश कुरधुंडकर यांनी सुवर्णा मते, समिक्षा बाचीम, दिनेश मते, सुरेश मते यांच्या विरुध्द दिनांक १७/१०/२०२४ रोजी सदर रस्ता बंद केला असल्याबाबत फिर्याद दिली असल्याचे दिसुन येते.

**२४**. निशाणी क्र. ७३ सोबत मुळ प्रतिवादींनी पंचयादीची छायांकित प्रत दाखल केली असुन ती पाहिली असता, दिनांक १७/१०/२०२४ पोलीस बंदोबस्तामध्ये कावडी मंदीर ते देऊळ पर्यंत जाणारा रस्ता पंचांसमक्ष मोकळा करण्यात आल्याचे त्यात नमुद करण्यात आले आहे. सदर रस्त्यावर असलेले लोखंडी खांब व रस्त्याच्या कडेला असलेला सुचना बोर्ड काढुन ती ग्रामपंचायत,

पेढांबे यांच्याकडे जमा करण्यात आल्याचे दिसुन येते.

**२५**. निशाणी क्र. ७५ सोबत मुळ प्रतिवादींनी माखजन, पोलीस दुरक्षेत्र येथे संदीप यशवंत येलोंडे यांनी दाखल केलेल्या अर्जाची छायांकित प्रत दाखल केली आहे त्यावर दिनांक १७/१२/२०२५ रोजीची पोलीस उपनिरीक्षक, संगमेश्वर यांची पोहोच म्हणुन सही असल्याचे दिसुन येते. त्यामध्ये सदर अर्जदार संदीप याने त्यास प्रकाश सोनु मते यांनी गाडी खाली आणु नको, असे सांगितल्याने त्याला समज देण्याविषयी त्यात विनंती करण्यात आली आहे.

**२६**. एकंदरीत उभपक्षकारांचे परस्पर विरोधी अभिकथन व दाखल कागदपत्रांवरुन, मुळ प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादी यांनी मांडलेले अभिकथन संक्षिप्तरित्या फेटाळण्याजोगे नसुन गुणदोषांवर निकाली काढण्यासाठी संपरीक्षेची आवश्यकता असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, मुळ प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादी यांच्या लाभात सकृतदर्शनी केस असल्याचे दिसुन येते.

**२७**. एकंदरीत अभिलेखावरील कागदपत्रांवरुन सकृतदर्शनी असे दिसुन येते की, कावडी बंदर ते देऊळ असा रस्ता ग्रामपंचायत दप्तरी नोंदविण्यात आला होता. सदर रस्त्याचे विभाजन होवुन मुख्य रस्ता ते चंडीका मानाई मंदीर रस्ता व मुख्य रस्ता ते यशवीचा पऱ्या रस्ता, असे दोन रस्ते होवुन त्यांची नोंद देखील ग्रामपंचायत दप्तरी असल्याचे दिसुन येते. मुळ प्रतिवादींनी निशाणी क्र. ७३ सोबत दाखल केलेल्या पंचयादीच्या छायांकित प्रतीवरुन सदर रस्त्यावरील लोखंडी दोन खांब व सुचना बोर्ड पंचासमक्ष काढण्यात येवुन तो रस्ता दिनांक १७/१०/२०२४ रोजी रिकामा करण्यात आल्याचे दिसुन येते. अभिलेखावर वाद मिळकतीवरील रस्त्याची उभयपक्षकारांकडुन वेगवेगळया तारखांना छायाचित्रे दाखल करण्यात आली आहेत. परंतु, नुकत्याच दाखल केलेल्या निशाणी क्र. ७० व ७३ सोबतच्या छायाचित्रांवरुन

सदर रस्त्यावर जंगली लाकडी खांब रोवल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे, सद्यस्थितीत सदर रस्त्यावर जंगली खांब असल्याचे दिसुन येत नसल्याने जंगली खांब काढुन घेवुन रस्ता पुर्ववत मोकळा करण्याचा तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ व ११ यांना देण्यासाठी मुळ प्रतिवादी पात्र नाहीत. तो दिलासा नामंजुर होण्यास पात्र आहे.

२८. अभिलेखावरील कागदपत्रांवरुन, वाद मिळकतीच्या रस्त्यावरुन, प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी मुळ प्रतिवादी व सदर रस्त्याचा वापर करणाऱ्या वाडीतील लोकांना अडथळा निर्माण केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. तसे म्हणणे प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०२ यांनी देखील त्यांच्या म्हणण्यामध्ये मांडले आहे. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये, रस्त्याचा वापर गणपती विसर्जन व वैद्यकीय गरजेस्तव करणेस त्यांची हरकत नसल्याचे म्हणणे मांडले आहे. अशा परिस्थीतीत, अर्ज मंजूर करणे गरजेचे वाटते. अर्ज मंजुर केल्यास प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे दिसुन येत नाही. याउलट, अर्ज नामंजुर केल्यास मुळ प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादी व तेथील वाडीतील कुटूंबियांना सदरचा रस्ता आवश्यक त्या कामासाठी, दैनंदिन व्यवहारासाठी व वैद्यकीय गरजेसाठी वापरता येणार नाही. त्यामुळे, त्यांचे अधिक नुकसान होईल, असे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, न्यायाचा तौलानिक तराजु देखील मुळ प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादी यांच्या बाजुने आहे. सबब, प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांचेविरुध्द त्यांनी सदर रस्त्याचा वापर करण्यास स्वतः अगर इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये, असा तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यास मुळ प्रतिवादी पात्र आहेत. सबब, मी मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ चे निष्कर्ष त्याप्रमाणे नोंदविलेले आहेत.

**<u>मुद्दा क्र. ०४ करीता</u> :–**

**२९.** मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ वरील निष्कर्षांमुळे, प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

**<u>आदेश</u>**

**१.** अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

**२.** प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०५, ०७ ते ०९ व ११ यांनी दावा मिळकत रस्त्यावर मुळ प्रतिवादींना स्वतः अगर इतरांमार्फत हरकत व अडथळा होईल, असे कोणतेही कृत्य करु नये, असा तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिदाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत मंजूर करण्यात येत आहे.

**३.** प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ व ११ यांनी प्रतिदावा मिळकत रस्त्यावर उभे केलेले जंगली लाकडी खांब काढून टाकून रस्ता पुर्ववत मोकळा करण्याचा तुर्तातुर्त मनाई आदेश करण्याचा दिलासा याद्वारे नामंजुर करण्यात येत आहे.

**४.** खर्चाबाबत आदेश नाही.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.01.07 16:19:27 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक २३/१२/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख,

देवरुख. जि. रत्नागिरी.

**-:CERTIFICATE:-**

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 23/12/2025 |
| Order signed by PO. on | :- | 07/01/2026 |
| Order uploaded on | :- | 07/01/2026 |